# पतसंस्थांसाठी एस. आर. ओ.

राज्यातील पतसंस्थांना संजिवनी देणारा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. थकबाकी सारख्या जटील प्रश्नावर मात करण्यासाठी राज्य सरकारने पतसंस्थांना त्यांचे स्तरावर थेट एस.आर.ओ. नियुक्त करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अंतर्गत ''विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी'' चे अधिकार महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बिगरशेती नागरी सहकारी पतसंस्था यांना दि. २ एप्रिल २००५ रोजी महाराष्ट्र राज्याचे सहकार पणन विभागाने नोटिफिकेशन काढून पतसंस्थांना दिलासा दिलेला आहे. राज्याच्या सहकार आयुक्तांनी या आदेशाची अंमलबजावणी १/०६/२००५ पासून पतसंस्थांसाठी परिपत्रक काढून लागू केलेली आहे. राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, सर्व जिल्हा उपनिबंधक, सर्व सहनिबंधक व सर्व सहाय्यक निबंधक यांनी मात्र राज्यातील १४ हजार पतसंस्थांना हे परिपत्रक पोहचविण्यासाठी व माहितीसाठी कुठलाही कार्यक्रम शासकीय स्तरावर व कार्यालयीन स्तरावर तयार केलेला नाही, ही बाब आश्चर्यजनक आहे. तरी सुध्दा पतसंस्थांमध्ये काम करणारे हजारो कार्यकर्ते व लाखो अधिकारी /कर्मचारी यांना हे अवगत व्हावे यासाठी **'पतसंस्था परिवार'** हे काम अग्रक्रमाने करीत आहे.

कलम १५६ चे अधिकार हे सर्व पतसंस्थांसाठी नाहीत हे प्रथम नमूद करीत आहोत. **हे अधिकार कार्यक्षेत्र व ठेवींशी निगडीत आहे.** अशाच पतसंस्थांना या परिपत्रकाचा लाभ उठविता येणार आहे. त्याही पुढे हेही नमूद करीत आहोत की, १५६ चे वसुलीचे अधिकार वरील निकषानुसार ज्या पतसंस्थांना मिळवायचे आहेत, त्यांना सदरहू प्रस्ताव कसे तयार करायचे, दाखल कसे करायचे, ठराव कसा द्यायचा व इतर माहिति प्रस्तावासोबत काय व कशी जोडावयाची हे १००टक्के ज्ञात असणे शक्य नाही. आणि याचाच गैरफायदा घेऊन या व्यवस्थेतील दलाल, व संबंधित लोक पतसंस्थांना लुटण्याची एकही संधी सोडणार नाही. आणि म्हणून एकही पैसा कोणालाही न देता, कलम १५६ नुसार वसुलीचे अधिकार ज्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र व ठेवी या निकष पाळणाऱ्या सर्वांना मिळायला पाहिजेत व ते बिगर पैशाने व वेळेत मिळायला पाहिजे, यासाठी ''पतसंस्था परिवार'' याच अंकात सर्व माहिती ढोबळपणे व प्रस्तावाचा नमुना, ठरावाचा नमुना तसेच वसुली अधिकाऱ्याची असावयाची पात्रता इत्यादी माहिती आपल्या सर्वांच्या माहितीसाठी देत आहोत.

वरीलप्रमाणे ज्या पतसंस्था कार्यक्षेत्राप्रमाणे ज्या निबंधकाकडे प्रस्ताव दाखल करतील त्यांनी त्यांच्या स्थळ प्रतीवर सही – शिक्का तारीख व वेळेसहीत पोहोच त्याचवेळी जरूर घ्यावी. आणि प्रस्ताव सादर केलेल्या

प्रस्तावाच्या बाबत काही त्रुटी आहेत काय? असे लेखी विचारावे. व वरीलप्रमाणे पोहोच जरूर घ्यावी. शिवाय त्या कालावधीत जर त्यांनी काही कळविले नाही तर पुन्हा १५ दिवसांनी स्मरणपत्र पाठवावे व पोहोच घ्यावी. व एवढे करूनही दिलेल्या प्रस्तावा संदर्भात संबंधीत निबंधकाकडून मंजुरी किंवा नामंजुरीचे पत्र आपल्या पतसंस्थेस पोष्टाद्वारे प्राप्त झाले नाही तर पुन्हा एकदा ७ दिवसांचे द्वितीय स्मरणपत्र पाठवावे व पोहोच घ्यावी. परंतु निबंधकांच्या कार्यालयात पुन्हा-पुन्हा जाऊन स्वत:हून आर्थिक संकटास निमंत्रण देऊ नये हे जाणिवपुर्वक निदर्शनास आणून देत आहोत.

एवढे करूनही आपण दाखल केलेल्या प्रस्तावाचे लेखी उत्तर जर आपणांस मिळाले नाही तर आपण सर्व कागदपत्रांनिशी कृपया आमचेशी संबंधीत कागदपत्रांसहीत त्वरीत संपर्क साधावा.

वरील सर्व माहिती ह्यासाठी देत आहोत की, दोन वर्षांपुर्वी, राज्याच्या सहकार आयुक्तांनी सर्व पतसंस्थांना आदर्श उपविधी सक्तीने स्विकारण्यासाठी आदेश निर्गमीत केले होते आणि पतसंस्थांनी त्याप्रमाणे आपापले प्रस्ताव संबंधीत निबंधकाकडे दाखल केले होते. परंतु पैसे घेतल्याशिवाय आदर्श उपविधी मंजुर न करण्याचे धोरण सर्व स्तरावर राबविल्याचे सर्वश्रूत आहे. म्हणून ह्यावेळेस तरी कोणासही एकही नवा पैसा द्यायचा नाही. अन्यथा पुन्हा काळ सोकावला जाईल. व याला आपणच जबाबदार राहू व त्याचे दुष्परिणाम आपणांस भविष्यात भोगावे लागतील. पतसंस्थांची लूट थांबावी व संबंधीतांचे पैसे उकळण्याचे धंदे इथून पुढे तरी थांबले पाहिजेत. व यासाठी पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांनी उघड-उघड पुढाकार घेतला पाहिजे आणि तरच ही चळवळ सर्व सामान्यांच्या हातात राहील. अन्यथा धनवंत आपणांस आणखी बरबाद करून टाकतील, व ही चळवळ फक्त त्यांच्यासाठीच राबविली जाईल.

पुन्हा एकदा आपल्या माहितीसाठी 'पतसंस्था परिवार' च्या ह्या अंकात २ एप्रिल २००५ रोजी महाराष्ट्र राज्याचे सहकार व पणन् विभाग नोटीफिकेशन, १/०६/२००५ चे अप्पर निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक, पतसंस्थांनी संबंधीत निबंधकांना कसा अर्ज करावा त्याचा नमुना, पतसंस्थांचा ठराव व वसुली अधिकाऱ्याची असावयाची पात्रता या संदर्भात नमुन्यात दाखल माहिती जोडलेली आहे. त्याचा योग्य असा आधार घ्यावा.

पतसंस्थांना हेही कळविण्यात येते की, १५६ चे अधिकार मिळणेसाठी आपल्या पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रानुसार संबंधीत सहकारी निबंधकाकडेच, विहीत नमुन्यात प्रस्ताव दाखल करण्यात यावेत. उदा. ज्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. त्या पतसंस्थांनी विभागीय सहनिबंधकाकडे प्रस्ताव दाखल करावेत. ज्या पतसंस्थांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यांपेक्षा अधिक आहेत त्या सर्व पतसंस्थांनी पुणे येथील सहकार आयुक्तांच्या कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल करावेत.

पतसंस्थांना १५६ चे अधिकार देणे संदर्भातील भावना चांगली आहे. जेणे करून पतसंस्थांमधील थकबाकी कमी करण्यासाठी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी सहजपणे उपलब्ध व्हावे हा त्यामागील हेतू आहे.

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात पतसंस्थांना विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी काही प्रमाणात का होईना उपलब्ध करून देण्याची सुविधा केवळ ''मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुंबई'' ही जिल्हा बँक करीत आहेत. सहकार खात्याचे अधिकारी तसेच कलेक्टर कार्यालयातील अधिकारी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याचे त्यांचेकडे अधिकार असताना कार्यबाहुल्यामुळे ते वसुलीचे काम वेळेत करू शकत नाही व त्यामुळे या शासकिय विभागाकडे विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी उपलब्ध होऊ शकतात, यावर कुणीही विश्वास ठेवायला तयार नाही. आणि म्हणून पतसंस्थांना स्वत:च्या कर्मचाऱ्यांना १५६ चे अधिकार मिळणे हे क्रांतीकारक पाऊल आहे. परंतु सध्याच्या या परिपत्रकामुळे राज्यातील केवळ १० टक्के पतसंस्थांनाच याचा लाभ उठविता येणार आहे. ९० टक्के पेक्षा जास्त उर्वरित पतसंस्था यांना या सुविधेपासून वंचित रहावे लागणार आहे. म्हणून राज्य सरकारला आपला हेतू आणखी विस्तारीत करण्यासाठी व पतसंस्थांची थकबाकी कमी करण्यासाठी, **मागणी करेल त्या पतसंस्थेला कार्यक्षेत्र व ठेवीची अट रद्द करून १५६ चे अधिकार देणे ही काळाची गरज आहे.** त्यासाठी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्यांना शिक्षण प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व त्यांची राज्यातील घटक कार्यालये निश्चितपणे समर्थ आहेत. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र सरकारचे अनेक कर्मचारी तसेच निमशासकीय कर्मचारी ज्यांना काम उपलब्ध करून देणे गरजेचे आहे व जे पुर्ण वेळ काम करू शकतात व सक्षम आहेत अशा शासकिय व निमशासकिय कर्मचाऱ्यांना देखील १५६ चे अधिकार प्रदान केल्यास पतसंस्थांना निश्चितपणे मदतच होणार आहे. शेवटी पतसंस्थांमधील भाग व ठेवीपोटी जमा झालेला पैसा व त्यांचा विनियोग थकबाकी कमी झाल्यानंतरच राज्याच्या आर्थिक विकासासाठीच होणार आहे. म्हणून सहकार आयुक्तांनी पतसंस्थांना १५६ चे अधिकार कार्यक्षेत्र व ठेवीची अट रद्द करूनच सर्वांसाठी खुले करावे असे आग्रहाने ह्या निमित्ताने आम्ही करीत आहोत.

तुर्त आहे त्या परिपत्रकाप्रमाणे संबंधीत पतसंस्थांनी १५६ चे अधिकार मिळणेसाठी संबंधित निबंधकांकडे प्रस्ताव दाखल करून अधिकार मिळवावे असे आवाहन करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**